महाराष्ट्र शासन

# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन नं. ०२२-२२६२०६६८, ६९, ७० फॅक्सः ०२२-२२६२०७८९ संकेत स्थळः www.gdcmumbai.org

क्र.शादमवरुमुंबई/निर्लेखनभंगारसामुग्री/कोटेशन/ ४७३ /२०१९ दिनांक- २३ /०७ /२०१९.

विषय- शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,मुंबई येथील निरोपयोगी /निकामी लाकडी/ लोखंडी सामानाची विल्हेवाट लावण्याबाबत....

संदर्भ- १) मा.अधिष्ठाता यांनी दिनांक १९/०७/२०१९ रोजीच्या टिप्पणीला मान्यता दिल्यानुसार.

२) कुत्रिमदंतशास्त्र विभागाचे पत्र क्र.७४३५-३८/२०१७,दिनांक २६.१०.२०१७.

उपरोक्त संदर्भाधिन विषयाला अनुसरुन नमूद करण्यात येते की, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,मुंबई या संस्थेतील निर्लेखित भंगार सामुग्रीची विल्हेवाट लावण्याकरीता आपल्याकडून जाहीर दरपत्रके मागविण्यात येत आहे.आपण सदर निरोपयोगी/निकामी भंगार वस्तूची पहाणी करुन त्यांची विल्हेवाट लावण्याकरीता दरपत्रके सादर करावयाची आहेत.

सदर दरपत्रक या कार्यालयास दिनांक ३१/०७/२०१९ पूर्वी सादर करावी. उशिरा आलेले दरपत्रक स्विकारले जाणार नाहीत. (विस्तृत अटी व शर्ती संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून,दरपत्रके सादर करण्यापूर्वी अटी व शर्ती पडताळाव्या.)

(स्वाक्षरी)

अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,मुंबई.

सोबत-अटी व शर्तीः-

१) दरपत्रक सिलींग वॅक्सने सिलबंद केलेल्या लिफाफ्यातून सादर करणे आवश्यक आहे.
२) भंगार साहित्य वजनी प्रति किलो दर या प्रमाणे जसे आहे तसे या विक्रीस उपलब्ध
३) सिलबंद न केलेले दरपत्रक (लिफाफा) स्विकारला जाणार नाही.
४) प्रति किलो अधिक रक्कम भरणारे दरपत्रक मान्य करण्यात येईल.
५) वस्तूचा आकारण्यात येणारा दर सुस्पष्टपणे देण्यात यावा. तसचे पॅनकार्ड आणणे आवश्यक आहे.
६) दरपत्रकाच्या लिफाफ्यावर संदर्भ क्रमांक,दिनांक व दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दिनांक नमूद करण्यात यावा.
७) दरपत्रक स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार अधिष्ठातानी ठेवला आहे.
८) उपरोक्त भंगार सामुग्रीची यादी अंदाजे असल्यामुळे कमी अथवा जास्त होऊ शकते.
९) सविस्तर अटी व शर्ती कार्यालयास उपलब्ध आहेत.त्या वाचूनच दरपत्रके भरण्यात यावी.
१०) शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,मुंबई या कार्यालयाची वेळ सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत असेल .या वेळेत भंगारसामुग्रीची पाहणी करता येईल. तसेच दुसरा व चौथा शनिवार ,रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी बंद राहील.
११) लोखंडी सामान, पत्र्याचे सामान, लाकडी सामान, प्लास्टिक सामान, रद्दी पेपर यासाठी वेगवेगळे दर नमुद करावी.
१२) दरपत्रके भरतांना रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार) इतकी ठेव रक्कम आगाउ जमा करावी लागेल.

Scanned by CamScanner